डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन
व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

२८ क्वीन्स् गार्डन, जुन्या सर्किट हाऊसजवळ, पुणे-४११ ००१. दूरध्वनी क्र. : ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३०
● E-mail : directorbarti@gmail.com ● Website : https://barti.maharashtra.gov.in ● फॅक्स :०२०-२६३३ ३५९६

**प्रेस नोट**

**दि. ३०/०३/२०१७**

**कृपया प्रसिद्धीसाठी**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, ( बार्टी ), पुणे संस्थेमार्फत अनुसूचित जातीतील एम. फील. व पी. एच.डी. करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF).

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे संस्थेतर्फे** अनुसूचित जातीतील होतकरू विद्यार्थ्यांसाठी "राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती" हा अभिनव उपक्रम **सन २०१२ पासून राबविण्यात येत आहे**. डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ सामाजिक समता व मानवी हक्कांसाठी काम करणारे नसून एक विद्वान व्यासंगी होते. अर्थशास्त्र व वित्तशास्त्र विषयात त्यांचे दिलेले योगदान अत्यंत प्रभावी असूनही राष्ट्राची सुरक्षितता व प्रगती या विषयातील त्यांच्या कार्यासंदर्भात समाज अनभिज्ञ आहे. प्रचंड कल्पकता, अभ्यास आणि कार्य हे संपूर्णतः वैज्ञानिक दृष्टीकोन आणि तर्कशास्त्र यावर आधारित असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महान व्यक्तीने सामाजिक बदल व मानवाची प्रगती हि केवळ शिक्षणामुळेच होऊ शकते असा संदेश जनमानसात दिला.

अनुसूचित जातीतील अभ्यासू, चिकित्सक वृत्ती असणाऱ्या व संशोधन क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या आर्थिक अडचणीचा सामना करावा लागू नये, त्यांचे शिक्षण अगदी सहजरित्या पूर्ण व्हावे या उदात्त हेतूने बार्टी संस्थेतर्फे अनुसूचित जातीच्या **एम.फिल./पी.एच.डी.** करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांच्या नावाने भारतातील पहिली संशोधन अधिछात्रवृती सुरु करण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सन १९१३ मध्ये कोलंबिया येथे उच्च शिक्षणासाठी प्रयाण केले, या ऐतिहासिक घटनेला वर्ष- २०१४ मध्ये १०१ वर्षे पूर्ण झाली या निमित्ताने वर्ष २०१४ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती करिता १०१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. तसेच पुढील प्रत्येक वर्षी अधिछात्रवृत्ती संख्येमध्ये एक संख्येने वाढ करून प्रतिवर्षी सदर योजना राबविण्यात येत आहे. वर्ष -२०१५ मध्ये १०२ विद्यार्थ्याची निवड करण्यात आली. वर्षे २०१५ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती व्यतिरिक्त "महात्मा जोतीराव फुले राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (JPNRF-25 जागा), "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती" (SPNRF-50 जागा, केवळ महिलांकरिता), "छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती" (CSNRF-25 जागा) अशा विविध थोर समाजसुधारकांच्या नावाने देखील बार्टीतर्फे देशामध्ये प्रथमच राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती सुरु करण्यात आली आहे.

अधिछात्रवृत्तीकरिता पदव्युत्तरपदवी धारक असणारा महाराष्ट्र राज्यातील मूळ रहिवासी अर्ज करू शकतो. समाजातील निःसमर्थ व्यक्तीकरिता देखील एकूण अधिछात्रवृतीपैकी ३% जागा आरक्षित करण्यात आल्या आहेत. **"कोणत्याही समाजाची उन्नती/ विकास हा त्या समाजातील महिलांच्या विकासावर अवलंबून असतो".** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या घोषवाक्याच्या प्रेरणेतून महिलांकरिता 50% आरक्षण देऊन महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने

देशामध्ये प्रथमच महिलांना उच्च शिक्षणसाठी संधी उपलब्ध करून एक नवीन उपक्रम साधला आहे. आरक्षणासोबतच शैक्षणिक पात्रता व संशोधन कौशल्य यांच्या जोरावर अनुसूचित जातीतील विद्यार्थीनीची उच्च शिक्षणातील वाढती टक्केवारी समाजासाठी व शासनासाठी अत्यंत समाधानाची व आत्मसन्मानाची बाब आहे.

निवड झालेल्या परंतु नोंदणीकृत असणाऱ्या प्रत्येक अधिछात्रवृत्तीधारकाला अधिछात्रवृत्ती रुपये 25000 प्रति माह, वार्षिक आकस्मिक खर्च व प्रतिमाह घरभाडे रक्कम दिली जाते. या रकमेच्या व्यतिरिक्त या सर्व विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचा लॅपटॉप संच देण्यात येतो.

नाविन्यपूर्ण अधिछात्रवृत्तीची संकल्पना, प्रकल्पाची सखोल आखणी, प्रभावी व पारदर्शक अंमलबजावणी, विद्यार्थ्यांकरिता समुपदेशन व मार्गदर्शन अशा अनेक उल्लेखनीय बाबीमुळे प्रकल्प यशस्वी ठरला आहे. मा. महासंचालक, श्री राजेशजी ढाबरे (IRS) यांच्या मार्गदर्शन व संशोधन विभागातील अनुभवी अधिकारी व कर्मचाऱ्यांची अखंड मेहनतीमुळे अधिछात्रवृतीच्या कामास गती प्राप्त होऊन महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात अधिछात्रवृती पोहचली आहे.

आजतागयात एकूण ४५३ विद्यार्थी संशोधन अधिछात्रवृत्तीचा लाभ घेत असून यापुढील प्रत्येक वर्षी सदर प्रकल्प अधिक प्रभावशालीपणे राबविण्याचा बार्टीचा मानस आहे. बार्टीच्या माध्यमातून अनुसूचित जातीतील विद्यार्थी उच्च शिक्षणाच्या या स्तरापर्यंत पोहचले आहेत ही अतिशय कौतुकास्पद बाब असून संशोधन क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारी आहे.

संशोधन क्षेत्रामधील कुशल मनुष्यबळाची कमतरता लक्षात घेता बार्टीकडून संशोधक विद्यार्थ्यांना त्यांनी निवड केलेल्या विषयात प्रविण्यत्व मिळवून तज्ञ म्हणून ओळख निर्माण करण्यासाठी सदैव प्रयत्न करण्यात येतात. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक प्रगतीसोबतच सामाजिक, शैक्षणिक, विज्ञान शाखा व इतर अनेक शाखांमध्ये महत्वपूर्ण व नाविन्यपूर्ण संशोधन करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले जाते. संशोधन क्षेत्रातील कौशल्य आत्मसात करताना सामाजिक विषयांसंदर्भात देखील रुची व सामाजिक बांधिलकी वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. अधिछात्रवृती प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक सलोखा, सामाजिक बांधिलकी, समता, सामाजिक न्याय व वैज्ञानिक दृष्टीकोन अशी मूल्य रुजविण्यासाठी अधिछात्रवृत्तीधारक विद्यार्थ्याकरिता संशोधन पद्धती तसेच सामाजिक समता व न्याय या विषयावर ५ ते ७ दिवसीय निवासी प्रशिक्षण देखील आयोजित केले जाते.

बार्टी मार्फत सुरु करण्यात आलेल्या या अभिनव संशोधन अधिछात्रवृत्तीमुळे अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेऊन भविष्यात प्रगतीच्या विविध संधी उपलब्ध करून देत आहे. सदर प्रकल्पांतर्गत 453 लाभार्थी विद्यार्थ्यांपैकी एकूण 33 विद्यार्थ्यांनी एम.फिल व 3 विद्यार्थ्यांनी पी. एच.डी. पूर्ण केली आहे. पुढील वर्षामध्ये साधारणः 30% विद्यार्थीची एम.फिल/ पी. एच.डी. पूर्ण होईल. संशोधन विद्यार्थ्यांकडून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध झालेल्या लेखांची संख्या 60 पेक्षा अधिक असून बार्टी संस्थेच्या कार्याचे हेच फलित आहे.

मा. श्री राजेशजी ढाबरे, महासंचालक, बार्टी, यांचेकडून संशोधन क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने "राज्यस्तरीय परिषद" आयोजीत करण्यात येईल. संशोधन कार्यामध्ये तज्ञ व विद्वान विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधन संधी उपलब्ध करून देण्याकरिता परदेशातील विविध विद्यापीठांसोबत करार करण्याचा मा. श्री राजेशजी ढाबरे यांचा मानस आहे.

प्रसिध्दी विभाग, बार्टी, पुणे